## दिनांक २९/०७/२०११ रोजी मा. जिल्हाधिकारी, जळगांव यांच्या अध्यक्षतेखाली जळगांव येथे संपन्न झालेल्या जिल्हा उद्योग मित्र समितीच्या सभेचे इतिवृत्त.

---

सभेस उपस्थित असलेल्या सर्व उपस्थितांची नोंद स्वाक्षरीसह कार्यालयीन नोंदवहीत घेण्यात आली आहे.

सर्वप्रथम सर्व उपस्थितांचे स्वागत करून महाव्यवस्थापक, जिउकें, जळगांव तथा सदस्य सचिव यांनी मा.अध्यक्षांचे परवानगीने सभेच्या कामकाजास सुरूवात केली. तदनंतर खालील विषयांवर सभेत सविस्तर चर्चा होवून खालीलप्रमाणे आवश्यक निर्णय सर्वानुमते घेण्यात आले-

**विषय क्र.१:- मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे:-**

दिनांक ०१/०७/२०११ रोजी झालेल्या मागील सभेचे इतिवृत्त सर्वानुमते कायम करण्यांत आले.

**विषय् क्र.२: मागील सभेच्या इतिवृत्तावरील कार्यवाहीचा आढावा घेणे -**

**१) जळगांव शहर महानगरपालिकेशी निगडीत औद्योगिक संघटनांचे विविध प्रश्न-**

जळगांव एमआयडीसी क्षेत्रामध्ये नवीन रस्ते तयार करणे , रस्त्यांची नियमीत देखभाल करणे , नवीन पथदिवे बसविणे , पथदिव्यांची नियमीत देखभाल करणे , पक्क्या गटारी तयार करणे , नियमीत साफसफाई करणे इ. समस्यांवर सविस्तर चर्चा करणेत आली. चर्चेत मा. आयुक्त, जळगांव शहर महानगरपालीका यांनी सांगीतले की मे.उच्च न्यायालय, खंडपिठ औरंगाबाद यांनी रिट पिटीशन क्रमांक १०१२/२००३ प्रकरणी दिलेला निकाल , मनपा महासभेने महासभा क्रमांक ३९, दिनांक ३०/०५/२००६ मध्ये पारित केलेला ठरावानुसार साफसफाईच्या कामाव्यतिरीक्त ही सर्व कामे करण्याची जबाबदारी एमआयडीसीची आहे , त्याचप्रमाणे कार्यकारी अभियंता, एमआयडीसी यांनी सांगीतले की शासनाच्या निर्णयानुसार संबधीत क्षेत्र मनपा, जळगांव यांचेकडे हस्तांतरीत केलेले आहे व पूढची सर्व कामे त्यांनी करावयाची आहे. तरीसुध्दा मे.न्यालयाच्या आदेशानुसार निकालानंतर १८ कोटीची कामे एमआयडीसीने केलेली आहेत. यावर औद्योगिक संघटनांनी सांगीतले की या सर्व सुविधा नियमीत पुरविण्याची जबाबदारी मनपा ची आहे व त्या जोपर्यंत उपलब्ध करुन दिल्या जात नाही तोपर्यंत मनपाने कोणतीही मागणी देयके पाठवू नये, पाठविली तरी उद्योजक ती भरणार नाहीत. चर्चेअंती मा.अध्यक्षांनी सांगीतले की संबधीत दोन्ही यंत्रणांनी न्यालयाच्या निकालाचा अभ्यास करुन सविस्तर अहवाल सादर करावा. तसेच पूढील योग्य ते निर्णय घेणेसाठी आयुक्त, मनपा, जळगांव / अधिक्षक अभियंता, मराविवि कं.लि, जळगांव / प्रादेशिक अधिकारी, एमआयडीसी, धुळे / कार्यकारी अभियंता, एमआयडीसी, धुळे यांनी १५ ऑगस्ट २०११ पूर्वी अध्यक्षांशी एकत्रीतपणे चर्चा करावी. याबाबत जिल्हा उद्योग केंद्राने समन्वय घडवून आणावा. त्याचप्रमाणे मनपा, जळगांव यांनी साफसफाईची कामे नियमीत करावी.

**कार्यवाही -** जिउकें / सर्व संबधीत.

**२) <u>धुळे येथील एमआयडीसीचे कार्यकारी अभियंता कार्यालय जळगांव येथे हलविणे बाबत-</u>**

धुळे येथे दिल्ली मुंबई इंडस्ट्रीयल कॉरिडॉर प्रकल्प नियोजीत आहे असे कार्यकारी अभियंता, एमआयडीसी, धुळे यांनी सांगीतले . सदर बाबतीत मा. अध्यक्षांनी सांगीतले की धुळे येथील कार्यालय हलविणे अथवा नवीन कार्यालय सुरु करणेबाबत मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, एमआयडीसी, मुंबई यांना त्यांचे स्वाक्षरीने अर्ध शासकीय पत्र पाठविणेबाबतचा मसुदा कार्यकारी अभियंता, एमआयडीसी, धुळे यांनी तात्काळ सादर करावा.

**<u>कार्यवाही</u> -** का.अ, एमआयडीसी, धुळे .

**३) <u>एमआयडीसीने औद्योगिक क्षेत्रासाठी नवीन अग्निशमन केंद्राची तरतूद करणे-</u>**

याबाबत आयुक्त, जळगांव शहर महानगर पालीका यांनी सभागृहात सांगीतले की नॅशनल फायर पालिसी अंतर्गत महानगर पालीका सध्या असलेल्या अग्नीशमन केंद्राचे आधुनिकीकरण लवकरच करणार आहे. यावर मा. अध्यक्षांना सदरचा विषय वगळण्यात यावा असे सांगीतले.

**<u>कार्यवाही</u>** आयुक्त, मनपा, जळगांव.

**४) <u>चाळीसगांव सहकारी औद्योगिक वसाहतीमधील रस्ते दुरूस्त करणे, पथदिप बसविणे व संस्थेच्या आवारात वृक्ष लागवड करणे बाबत.</u>**

सदर बाबतीत नगराध्यक्ष / मुख्याधिकारी, नगरपालिका, चाळीसगांव यांना सविस्तर पत्र जिल्हा उद्योग केंद्राने पाठवून पाठपुरावा करावा. तसेच सदर पत्रात मुख्याधिकारी, न.पा. चाळीसगांव हे आजच्या सभेस उपस्थित न राहील्याबाबत सभागृहाने नाराजी प्रकट केल्याचे नमुद करण्यात यावे, पत्राची प्रत नगर पालिका शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, जळगांव यांना योग्य त्या कार्यवाहीसाठी देणेत यावी. तसेच संस्थेनेसुध्दा त्यांचेकडे असलेल्या सर्व करांची थकबाकी तात्काळ न.पा. प्रशासनाकडे भरणा करावी.

**<u>कार्यवाही</u> -** नगराध्यक्ष , मुख्याधिकारी, चाळीसगांव न.पा / सह.औ.व.चाळीसगांव / नगरपालिका शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, जळगांव.

**५) <u>जळगांव औद्योगिक क्षेत्रातील भूखंड वाटपाबाबत-</u>**

या संदर्भात प्रादेशिक अधिकारी, एमआयडीसी, धुळे यांनी सांगीतले की भूखंड वाटपाबाबतचा नियोजीत ले-आऊट एमआयडीसीच्या मुख्य कार्यालयाकडून मंजूर नसला तरी भूखंड वाटपासाठी आजपर्यंत जे अर्ज एमआयडीसी कडून स्विकृत करण्यात आले आहेत त्यांची जेष्ठता सुची कायम ठेवावी असे मुख्यालयाचे आदेश आहेत. यावर औद्योगिक संघटनांच्या प्रतिनिधींनी सांगीतले की सदरच्या प्रक्रीयेत दलाल समाविष्ठ असून मोठया प्रमाणावर आर्थीक गैरप्रकार होणार आहेत त्यासाठी आजपर्यंत स्विकारण्यात आलेले सर्व अर्ज तात्काळ रदद करण्यात यावेत अशी आमची संवेदनशील मागणी आहे. याबाबत मा.अध्यक्षांनी सांगीतले की

जिल्हा उद्योग केंद्राने सदर बाब मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, एमआयडीसी, मुंबई यांना कळवावी.

**कार्यवाही-** जिल्हा उद्योग केंद्र,जळगांव.

**६) भुसावळ येथे तापी नदीचे पाणी प्रदुषणाबाबत-**

सदर बाबतीत महा.प्रदु.नियंत्रण मंडळाचे अधिका-यांनी सांगीतले की दिनांक ०७/०१/२०११ च्या सभेत ठरल्याप्रमाणे कार्यवाही केलेली असून दिनांक १८/०४/२०११ रोजी संबधीतांना कारणे दाखवा नोटीसा देणेत आलेल्या आहेत. प्रदुषण थांबलेलले असून सध्यातरी कोणाची तक्रार नाही. यावर सदरचा विषय वगळण्यात यावा असे ठरले.

**७) जळगांव जिल्हयातील जळगांव, भुसावळ, चाळीसगांव एमआयडीसी क्षेत्र विकासामध्ये येणा-या अडचणींबाबत मा. ना.उद्योग मंत्री महोदयांसमवेत बैठक आयोजीत करणेबाबत-**

सदर बाबतीत मा. अध्यक्षांनी सांगीतले की मागील सभेत ठरल्याप्रमाणे मा.श्री. संजय सावकारे, विधान सभा सदस्य, भुसावळ यांचेकडे या तीनही क्षेत्रांबाबतची सविस्तर टिप्पणी प्रादेशिक अधिकारी,एमआयडीसी, धुळे यांनी लवकर सादर करावी तसेच औद्योगिक संघटनांनीसुध्दा त्यांच्या स्तरावरुन बैठक आयोजीत करणेसाठी समन्वय घडवून आणावा.

**कार्यवाही-** प्रादेशिक अधिकारी,एमआयडीसी, धुळे / सर्व औ. संघटना.

**८) भुसावळ एमआयडीसी क्षेत्रामध्ये ३३ केव्ही सब स्टेशनसाठी जागा मिळणेबाबत-**

सदरचा विषय पूढील सभेच्या आंत निकाली काढावा असे मागील सभेत मा. अध्यक्षांनी सांगीतलेले असतांनासुध्दा कार्यवाही न झाल्याबाबत मा.अध्यक्षांनी नाराजी प्रकट केली व दिनांक ०३/०८/२०११ रोजी श्री. त्र्यंबके, कार्यकारी अभियंता, मराविवि कंपनी लि. / प्रादेशिक अधिकारी, एमआयडीसी, धुळे यांनी एकत्र सदर क्षेत्राचे ठिकाणी जावून जागा निश्चित करावी व पूढच्या सभेत सदर विषय उपस्थित होणार नाही याची दक्षता घ्यावी असे मा. अध्यक्षांनी सुचीत केले.

**कार्यवाही-** अधिक्षक अभियंता, मराविवि कंपनी लि, जळगांव / प्रादेशिक अधिकारी, एमआयडीसी, धुळे.

**९) भुसावळ एमआयडीसी क्षेत्र दुसरा फेज विकसीत करणेबाबत-**

या बाबत प्रादेशिक अधिकारी, एमआयडीसी,धुळे यांनी सांगीतले की या क्षेत्रास जोडणारा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६ ते शिरपूर कन्हाळा या रस्त्याच्या दुरुस्ती बाबतची निवीदा

काढण्यात आलेली असून पूढील कार्यवाही सुरु आहे. यावर मा.अध्यक्षांनी सांगीतले की एमआयडीसीने कामाची गती वाढवावी.

**कार्यवाही-** कार्यकारी अभियंता,एमआयडीसी, धुळे.

१०) **मे. संपत्ती इंडस्ट्रीज, अे-५३,सह.औद्यो.वसाहत लि, जळगांव या घटकाबाबत तक्रार- स.औ.व.जळगांव-पत्र क्रं-१२३, दिनांक २९/११/२०१०.**

सदर तक्रारीबाबत कारवाई करणेत आलेली आहे असे प्रदुषण नियंत्रण मंडळाचे अधिका-यांनी सांगीतले असता उपस्थित उद्योजकांनी प्रदुषण थांबलेले नसल्याचे निदर्शनास आणून दिले असतां मा. अध्यक्षांनी सांगीतले की महा.प्रदु.मंडळाने प्रदुषण थांबल्याची खात्री करुन तसा सुस्पष्ट अनुपालन अहवाल जिल्हा उद्योग केंद्राकडे तात्काळ पाठवावा.

**कार्यवाही-** उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मं.जळगांव.

११) **औद्योगिक विज पुरवठा डीमांड नोट / मंजूरी / जोडणी विहीत मुदतीत मिळणेबाबत -श्री.किशोर ढाके, उद्योजक, एम-सेक्टर, एमआयडीसी, जळगांव.**

या संदर्भात अधिक्षक अभियंता, मराविविकं लि, जळगांव यांनी सांगीतले की अधिका-यांना असलेले अधिकार / वेळापत्रक इ. बाबत कंपनीची जी नियमावली ( एसओपी ) आहे त्याबाबतची सविस्तर महिती वेब-साईटवर उपलब्ध आहे. यावर मा. अध्यक्षांनी सांगीतले की मागील सभेत ठरल्याप्रमाणे सर्व प्रमुख स्थानिक वृत्तपत्रांमध्ये व्यापक प्रसिध्दी देणेची व्यवस्था करावी व त्याची प्रत सर्व औद्योगिक संघटनांना तसेच सदस्य सचिव, जिल्हा उद्योग मित्र समिती, जळगांव यांना पाठवावी.

**कार्यवाही-** अधिक्षक अभियंता, महा. विज वितरण कंपनी लि, जळगांव.

१२) **पाचोरा सहकारी औद्योगिक वसाहतीच्या मालकीच्या जागेची मोजणी करण्याकरीता पोलीस संरक्षण न मिळाल्याबाबत.**

या संदर्भात सविस्तर चर्चेअंती मा.अध्यक्षांनी सांगीतले की संस्थेने आता पुन्हा मोजणीची तारीख घ्यावी व तसे पोलीस संरक्षण मिळणेबाबत सविस्तर निवेदन मा. जिल्हाधिकारी , जळगांव / मा. जिल्हा पोलीस अधिक्षक, जळगांव / सदस्य सचिव,जिल्हा उद्योग मित्र समिती यांचेकडे सादर करावे. त्यावर योग्य ती कार्यवाही केली जाईल.

**कार्यवाही-** संबधीत संस्था / यंत्रणा.

१३) **एमआडीसीच्या मह-ई-बीज- एक खिडकी योजनेचे सादरीकरण करणे-**

या संदर्भात मा. प्रधान सचिव (उद्योग) यांचे अ.शा.पत्र दिनांक ०४/११/२०१० व उद्योग संचालनालयाचे पत्र क्रमांक ३०२४, दिनांक १९/०३/२०११ चे अनुषंगाने सदर योजनेचे आजच्या सभेत सादरीकरण करणेबाबत जिल्हा उद्योग केंद्राने पत्र दिनांक २२/०३/२०११ अन्वये प्रादेशिक अधिकारी, एमआयडीसी, धुळे यांना कळविले होते. तथापी काही कारणास्तव त्यांचेकडून सदरचे सादरीकरण होवू शकले नाही असे निदर्शनास आले असतां मा. अध्यक्षांनी सांगीतले की प्रादेशिक अधिकारी, एमआयडीसी, धुळे यांनी नोंद घेवून पूर्तता करावी.

**कार्यवाही-** प्रादेशिक अधिकारी,एमआयडीसी,धुळे.

१४) **एमआयडीसी कडून उद्योगांना मंजूर केलेले भूखंड / सहकारी औद्योगिक वसाहतींच्या क्षेत्रामधील गौण खनिजावर आकारण्यात येणारे स्वामीत्व धन माफ करणेबाबत-**

या संदर्भात महाराष्ट्र शासन, महसुल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक - गौखनि-१०/०३०७/प्र.क्रं.५७/ख, मंत्रालय, मुंबई, दिनांक ०७/०१/२०११ बाबत सभेत सविस्तर माहिती देणेत आली.

**विषय क्रमांकः३ः मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळच्या विषयांवर चर्चा-**

**१) जळगांव जिल्हा एमआयडीसी क्षेत्रातील अतिरीक्त पाणी देयके -**

जळगांव जिल्हयातील एमआयडीसी क्षेत्रातील उद्योजकांना नुकतीच एमआयडीसीने ४ ते ३५ लाखापर्यंत अतिरीक्त पाणी देयके पाठविल्यामुळे सभेतही त्याचे पडसाद दिसून आले. याबाबत मा.अध्यक्षांनी सभेत विचारणा केली असता कार्यकारी अभियंता, एमआयडीसी, धुळे यांनी सांगीतले की श्री. पी.जे. रंगारी, मुख्य अभियंता, एमआयडीसी, नांदेड यांचेशी दुरध्वनीवरुन चर्चा झ ालेली असून ते दिनांक ०१/०८/२०११ रोजी जळगांव येथे येवून दुपारी ०३-०० वाजता उप अभियंता, एमआयडीसी, जळगांव यांच्या कार्यालयात औद्योगिक संघटनांच्या प्रतिनिधींशी चर्चा करणार आहेत. यावर मा.अध्यक्षांनी सांगीतले की सदरचा प्रश्न तात्काळ समन्वयाने सोडविण्यात यावा.

**कार्यवाहीः** कार्यकारी अभियंता,एमआयडीसी, धुळे / औ.संघटना.

**२) जळगांव एमआयडीसी भूखंड क्रमांक डी-४५/२ व शेड क्रमांक डब्ल्यु-१ हे पूर्णपणे रिकामे असल्याने ते रदद करुन नवीन उद्योजकांना उपलब्ध करुन देणेबाबत -** या संदर्भात श्री.भास्कर नामदेव माळी, डी-४६/१, एमआयडीसी, जळगांव यांनी सभेत दिनांक २८/०७/२०११ चे निवेदन सादर केले. त्यावर सभेत सविस्तर चर्चा करण्यात आली. चर्चेअंती मा. अध्यक्षांनी सांगीतले की प्रादेशिक अधिकारी, एमआयडीसी, धुळे यांनी

महामंडळाच्या नियमावलीनुसार कार्यवाही करुन अनुपालन अहवाल पूढील सभेच्या आंत जिल्हा उद्योग केंद्राकडे पाठवावा.

**कार्यवाहीः** प्रादेशिक अधिकारी, एमआयडीसी, धुळे.

**३) राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६ कालिका माता चौक ते गोदावरी कॉलेज पर्यंत पक्क्या साईड पटटया तयार करणे तसेच सिग्नल बसविणे-**

या ठिकाणी सतत अपघात होत असल्याने कालिका माता चौक ते गोदावरी कॉलेज पर्यंत महामार्गाच्या दोन्ही बाजूने पक्की खडी टाकून साईड पटटया तयार करुन त्यावर डांबर टाकून तात्काळ तयार करण्यात याव्यात , तसेच गोदावरी कॉलेजसमोर वाहतुक सिग्नल तात्काळ बसविणेत यावा व नागरीकांचे जीव वाचविण्यात यावे अशी मागणी औद्योगिक संघटनांच्या प्रतिनिधींनी सभेत केली असता मा. अध्यक्षांनी सांगीतले की कार्यकारी अभियंता, राष्ट्रिय महामार्ग, विभाग जळगांव / आयुक्त, जळगांव शहर महानगरपालीका, जळगांव यांनी वैयक्तीक लक्ष देवून समन्वयाने सदरचा प्रश्न तात्काळ सोडवावा.

**कार्यवाहीः** कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग, विभाग जळगांव / आयुक्त,
जळगांव शहर महानगरपालीका, जळगांव.

शेवटी सर्व उपस्थितांचे आभार मानून सदस्य-सचिव यांनी मा.अध्यक्षांचे परवानगीने सभा संपल्याचे जाहिर केले.

सही/-
महाव्यवस्थापक तथा सदस्य-सचिव,
जिल्हा उद्योग मित्र समिती, जळगांव.

सही/-
मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,
जिल्हा उद्योग मित्र समिती, जळगांव.